# बजाज फाउंडेशनतर्फे सेंद्रीय शेती कार्यशाळेचे आयोजन

**वर्धा (प्रतिनिधी)**

बजाज फाउंडेशन बजाज समूहाच्या सामाजिक दायित्व अंतर्गत सोमवार २८ फेब्रु.रोजी वर्धा येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. देशी बियाणांच्या वाणांना प्रोत्साहन देणे आणि बियांची निवड आणि उपचार याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने एक प्रदर्शन कम कार्यशाळा आयोजित केली होती. संपूर्ण जिल्हयात बियाणे पुरेशा प्रमाणात आणण्यासाठी मेळाव्याने शेतक-यांना सेंद्रीय शेती करण्यास प्रोत्साहित केले.

बजाज फाउंडेशनचे विश्वस्त अपूर्व बजाज यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या कार्यशाळेचे प्रवीण मुळे, जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्ड आणि विदया मानकर, प्रकल्प संचालक कृषी तंत्रज्ञान संघटना हरिभाई मोरी अध्यक्ष, सीएसआर बजाज फाउंडेशन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

१०० हून अधिक शेतकरी सहभागी आणि असंख्य देशी बियाण्यांच्या प्रदर्शनात कार्यशाळेने उपस्थित नैसर्गिक शेती पध्दतींव्दारे लागवड करता येणा-या विविध प्रकारच्या पिकांबद्दल जाणून घेण्याची दुर्मिळ संधी उपलब्ध करून दिली. अधिक जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने स्थानिक कृषी महादियालये आणि व्यावसायिक शाळांमधील विदयार्थ्यांनाही दिवसभर चालणा-या कार्यशाळेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. रामकृष्ण बजाज कृषी महाविदयालयाच्या विदयार्थ्यांसह विविध महाविदयालयातील सुमारे १०० विदयार्थ्यांनी या मेळाव्याला हजेरी लावली आणि शेतकरी आणि कृषी तज्ञांकडून सेंद्रीय शेतीतील नवीनतम तंत्रे आणि सर्वोत्तम पध्दती शिकून घेतल्या.

हे पत्र,मुद्रक मालक, प्रकाशक दिलीप लक्ष्मणराव एडतकर यांनी ममता प्रकाशन सी–२६, औद्योगिक वसाहत सातुर्णा बडनेरा रोड, अमरावती येथे छा
**RNI NO:MAHMAR/2016/69737 जिल्हा प्रतिनिधी : जितू गोरडे, आवृत्ती संपादक : राजू गोरडे** (पीआरबी ॲक्ट नुसार य